गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक १७ वा ● शनिवार ०३ जून २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| Volume 1 | Issue 17 | Date : 03/06/2023 | blow :Saturday | Page 4 | Price 4

## २५० किमी धावल्यानंतर रुळावरून घसरली कोरोमंडल एक्सप्रेस

# एका झटक्यात २३३ जणांचा मृत्यू



हावडा एक्सप्रेस आधी मालगाडीला धडकली; त्यानंतर कोरोमंडल एक्सप्रेसवर मालगाडी आदळली

**अपघातानंतर रेल्वेकडून हेल्पलाईन नंबर जारी**

**हावडा :** ०३३ – २६३८२२१७

**खडगपूर :** ८९७२०७३९२५, ९३३२३९२३३९

**बालासोर :** ८२४९५९१५५९, ७९७८४१८३२२

**शालीमार (कोलकाता) :** ९९०३३७०७४६

**रेलमदद :** ०४४– २५३५ ४७७१

बालासोर : ओडिशाच्या बालासोर जिल्ह्यात शुक्रवारी तीन रेल्वे ट्रेन्सची एकमेकांना धडक झाली. येथे बहनागा स्टेशनजवळ SMVBA हावडा एक्सप्रेस (१२८६४), कोरोमंडल एक्सप्रेस आणि मालगाडीची टक्कर झाली. प्रथम हावडा एक्सप्रेस मालगाडीला धडकली, त्यानंतर मालगाडी कोरोमंडलला धडकली. या अपघातात २३३ जणांचा मृत्यू झाला आहे. कोरोमंडल एक्स्प्रेस पश्चिम बंगालमधील कोलकातामधील हावडा स्टेशन आणि तामिळनाडूमधील चेन्नई दरम्यान धावते. अपघात झाला तेव्हा रेल्वेत असणाऱ्या प्रवाशांना सावरण्याची संधीच मिळाली नसल्याचं प्रत्यक्षदर्शींचं म्हणणं आहे.

एका झटक्यात ट्रेन रुळावरून घसरली आणि गोंधळ झाला. ट्रेनचे डब्बे उलटल्यानं अनेक प्रवासी आत अडकले होते. त्यांची सुटका करण्यात अडचण येत आहे. दरम्यान, बचाव पथकं घटनास्थळी दाखल झाली असून सध्या बचाव कार्य युद्ध पातळीवर सुरू आहे.

ट्रेन क्रमांक १२८४१ कोरोमंडल एक्सप्रेस शालीमार (पश्चिम बंगाल) रेल्वे स्थानकावरून चेन्नई सेंट्रलपर्यंत प्रवास करते. ही ट्रेन २५ तासांत १६५९ किलोमीटर अंतर कापते. शुक्रवारी, कोरोमंडल एक्सप्रेसनं शालिमार स्टेशनच्या प्लॅटफॉर्म क्रमांक २ वरून १० मिनिटं उशीर केला. काही मिनिटांनी ट्रेननं उशीर झालेला वेळ कव्हर केला. मात्र त्यानंतर साधारण २५३ किमी अंतरावरील बहंगा बाजार स्थानकाजवळ काळानं घाला घातला आणि ट्रेनचा भीषण अपघात झाला. मिळालेल्या माहितीनुसार, या अपघातात एकूण १५ रेल्वेचे डब्बे रुळावरून घसरल्याची । पान २ वर

# छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याचे व्हिजन दिले : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी

## रायगड येथे 'शिवसृष्टी' उभारण्यासाठी ५० कोटींचा निधी : मुख्यमंत्री

मुंबई : किल्ले रायगडाच्या पायथ्याशी ४५ एकरात शिवसृष्टी उभारण्यासाठी राज्य शासन ५० कोटी रुपयांचा निधी देणार आहे तसेच प्रतापगडाच्या संवर्धनासाठी राज्य शासन प्राधिकरण निर्माण करणार आहे, अशी घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रायगडावर झालेल्या ३५० व्या शिवराज्याभिषेक वर्ष सोहळ्यात केली. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याचे व्हिजन दिले, अशा शब्दांत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्यकर्तृत्वाचा गौरव आपल्या संदेशातून केला.



छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५० व्या शिवराज्याभिषेक वर्ष सोहळ्यानिमित्त राज्य शासनामार्फत रायगडावर आयोजित दिमाखदार सोहळ्यात मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संदेशाचे प्रक्षेपणही करण्यात आले.उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार, पालकमंत्री उदय सामंत, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, ग्रामविकास मंत्री गिरीष महाजन, बंदरे व खनिकर्म मंत्री दादाजी भुसे, खासदार छत्रपती उदयनराजे भोसले, खासदार सुनील तटकरे, खासदार सदाशिव लोखंडे, खासदार डॉ.श्रीकांत शिंदे, आमदार भरत गोगावले तसेच इतर लोकप्रतिनिधी, मान्यवर तसेच नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांचे राज्य गोरगरीब रयतेचे राज्य होते. त्यांनी जातिभेद केला नाही, छत्रपती शिवाजी महाराजांनी महिलांना पुढे येण्याची संधी दिली. महाराज त्यांच्या राज्यकारभाराच्या पद्धतीमुळे लोकप्रिय होते, जनतेची काळजी घेणारा हा राजा होता. छत्रपती शिवाजी महाराजांची शिकवण डोळ्यासमोर ठेवून कारभार करतोय, याचा आम्हाला अभिमान आहे. राज्य सरकारने शेतकऱ्यांना १ रुपयात पीक विमा देण्याची योजना केलेली आहे. केंद्र सरकारच्या योजनेप्रमाणे राज्य सरकारनेदेखील 'नमो शेतकरी सन्मान निधी' योजना सुरु केली आहे. सिंचन वाढीसाठी सरकारने अनेक निर्णय घेतले असून जलयुक्त शिवार योजना पुन्हा सुरु केली आहे. प्रतापगडाच्या संवर्धनासाठी खासदार उदयनराजे भोसले यांच्या अध्यक्षतेखाली राज्य शासन प्राधिकरण निर्माण करणार आहे. मुंबईतील कोस्टल रोडला छत्रपती संभाजी महाराजांचे नाव देण्यात येणार आहे, असेही मुख्यमंत्री श्री. शिंदे यावेळी म्हणाले.

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याचे व्हिजन दिले : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी

छत्रपती शिवाजी महाराजांनी सुशासन, राष्ट्रकल्याण, लोककल्याणाचा मार्ग दाखवला. शिवरायांनी स्वराज्याचे स्वप्न साकारले. कठीण काळात जनतेत आत्मविश्वास जागवला. सैन्य नेतृत्वाचे गुण त्यांनी शिकवले. राष्ट्र निर्माणाचे व्हिजन दिले. महाराजांच्या जीवनाचे अनेक पैलू आहेत. त्यांनी आरमाराचे महत्त्व जाणले. त्यांनी जलदुर्गांची निर्मिती केली. आजही जलदुर्ग अढळपणे टिकून आहेत. महाराजांनी एकता आणि अखंडता यांना प्राधान्य दिले. आज शिवाजी महाराजांच्या विचारांचे प्रतिबिंब 'एक भारत – श्रेष्ठ भारत' या संकल्पनेत पाहायला मिळते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक दिनाने नवी चेतना, नवी ऊर्जा दिली आहे. महाराजांचा राज्याभिषेक हा त्या काळातील एक अद्भुत आणि विशेष अध्याय आहे. महाराजांनी आक्रमकांच्या विरोधात लढाच दिला नाही, तर स्वराज्य शक्य आहे हा विश्वास जनतेच्या मनात निर्माण केला. त्यांचे व्यक्तिमत्व अद्भुत होते त्यांनी स्वराज्य ही स्थापन केले आणि सुराज्य ही स्थापन केले. त्यांनी राष्ट्र उभारणीचा व्यापक दृष्टिकोन मांडला. आपल्या सर्वांसमोर आदर्श निर्माण करणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांना मानाचा मुजरा, या शब्दांत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आपल्या दृकश्राव्य संदेशातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्यकर्तृत्वाला उजाळा दिला.

नवी दिल्ली येथे छत्रपतींचे राष्ट्रीय स्मारक उभारण्याची मागणी करणार : उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले, शिवराज्याभिषेक सोहळा आपण अनुभवत आहोत, हे आपले भाग्य आहे. महाराष्ट्र निर्मितीची सुरुवात स्वराज्य स्थापनेपासून झाली. । पान २ वर

## दहावीचा सोलापूर जिल्ह्याचा निकाल ९६.०६ टक्के

सोलापूर/प्रतिनिधीः सोलापूर जिल्ह्याचा इयत्ता दहावी परीक्षेचा निकाल शुक्रवारी दुपारी ऑनलाईनने जाहीर करण्यात आला असून त्यात सोलापूर जिल्ह्याचा ९६.०६ टक्के निकाल लागला असल्याची माहिती शिक्षण विभागाकडून देण्यात आली. जिल्ह्यात एकूण ६२ हजार ८०२ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली होती तर त्यातील ६० हजार ३२८ विद्यार्थी पास झाले आहेत. यामध्ये मागील वर्षाप्रमाणेच यंदाच्या वर्षी मुलांपेक्षा मुलींचे पास होण्याचे प्रमाण जास्त आहे. या परीक्षेसाठी एकूण ३४ हजार ०३३ मुलांपैकी ३२ हजार २०९ मुले पास झाली असून हे प्रमाण शेकडा ९४.६२ टक्के इतके आहे. तर २८ हजार ७६९ मुलींपैकी २८ हजार ११९ मुली पास झाल्या आहेत. हे प्रमाण ९७.७४ टक्के इतके आहे. एकूण पास विद्यार्थ्यात गुणवत्तेत २३ हजार ६४२ प्रथम श्रेणीत २२ हजार ७२४, द्वितीय श्रेणीत ११ हजार ६९५ तर पास श्रेणीत २ हजार २६७ विद्यार्थी आहेत. दहावी रिपिटर विद्यार्थ्यांमध्ये यावर्षी सर्वात मोठी आकडेवारी होती. त्यामध्ये जवळपास २८% विद्यार्थी नापास झाले आहेत. परीक्षेला रिपिटर विद्यार्थी बसलेल्यांची संख्या सोलापुरात ११७० इतकी होती. यापैकी ८२४ विद्यार्थी पास झाले आहेत. हे प्रमाण शेकडा ७०.४२ टक्के इतके आहे त्यामुळे रेग्युलर विद्यार्थ्यांपैकी रिपिटर विद्यार्थ्यांमध्ये नापास होण्याचे प्रमाण अधिक आहे.

## देशात व राज्यात परिवर्तनाचे चित्र, भाजपाचे पानिपत करू, नाना पटोलेंचा निर्धार




मुंबई : राज्यात सध्या महाविकास आघाडीला अनुकूल असे वातावरण आहे. काँग्रेस पक्ष राज्यातील सर्व लोकसभा मतदारसंघाचा आढावा घेत आहे. स्थानिक नेते आणि पदाधिकाऱ्यांची मते आजमावून घेतली जात आहेत. दोन दिवसांच्या या बैठकीनंतर लवकरच राज्यातील सर्व जिल्ह्याचे दौरे केले जातील, अशी माहिती काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिली आहे.शुक्रवारी सिंधुदुर्ग रत्नागिरी, ठाणे, धुळे, नंदुरबार, जळगाव, रावेर, अहमदनगर, शिर्डी, नाशिक, दिंडोरी, लातूर, बुलढाणा, अकोला, अमरावती, यवतमाळ वाशिम, गडचिरोली चिमूर, भंडारा गोंदिया, वर्धा, नागपूर, रामटेक आणि पालघर या मतदारसंघाचा आढावा घेण्यात आला. उर्वरित मतदारसंघाचा आढावा उद्या शनिवारी घेतला जाणार आहे. बैठकीनंतर टिळक भवन येथे प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, कार्यकर्त्यांमध्ये उत्साह आहे, निवडणुका केव्हाही लागल्या तरी काँग्रेस पक्ष तयार आहे. त्यादृष्टीने आढावा बैठकीत स्थानिक नेत्यांकडून माहिती घेतली जात आहे. विदर्भासह राज्यात विविध भागात । पान २ वर

## आता महसूल विभागातील दलाल प्रवृत्तीला बसणार आळा, राज्यात फिफो प्रणाली लागू

मुंबई : शासनाच्या विविध प्रमाणपत्रासाठी (र्त्रेींशीपाशर्पी उर्शीींळषळ– लरींश) दलालांमार्फत शॉर्टकट शोधला जातो. मग ते जात प्रमाणपत्र असो अथवा उत्पन्नाचा दाखला, दलाल प्रवृत्तीमुळे रांगेत असणाऱ्यांची कामे होत नाहीत. मात्र जे पैसे देऊन दलालामार्फत पोहचतात त्यांची कामे आधी होतात असाच अनुभव आहे. पण या शॉर्टकट साधणाऱ्या दलाल प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी संपूर्ण राज्यात 'फर्स्ट इन फर्स्ट आउट' म्हणजेच फिफो । पान २ चा

## मणिपूर हिंसाचारात सुमारे ९८ जणांचा मृत्यू, अमित शाहांच्या आवाहनानंतर नागरिकांकडून १४० शस्त्रास्त्रांचं समर्पण

मणिपूर : मणिपूरमध्ये एका महिन्यापूर्वी उसळलेल्या हिंसाचारात सुमारे ९८ जणांचा मृत्यू झाला आणि ३१० जण जखमी झाल्याची माहिती सरकारने दिली आहे. मणिपूर सरकारने २ जून रोजी एका निवेदनात ही माहिती प्रसिद्ध केली आहे. सध्या २७२ मदत छावण्यांमध्ये एकूण ३७,४५० लोक आश्रयाला आहेत, असे मुख्यमंत्री कार्यालयाने (उचज) जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. मणिपूरमध्ये आदिवासी आणि बिगर आदिवासी यांच्यात गेल्या महिन्यामध्ये हिंसाचार उफाळून आला होता.



ईशान्येकडील मणिपूर राज्य हिंसाचाराच्या आगीत होरपळत आहे. मणिपूर हिंसाचारानंतर आता केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांच्या आवाहनाचा परिणाम दिसून येत आहे. तेथील लोकांनी १४० शस्त्रे परत केली आहेत. सरकारने जारी केलेल्या निवेदनात सांगितलं आहे की, हिंसाचारातील मृत्यूंची संख्या ९८ आहे आणि जखमींची संख्या ३१० आहे. गेल्या एका महिन्यात, राज्य पोलिसांनी ३,७३४ गुन्हे दाखल केले आहेत आणि हिंसाचारात सहभागी असल्याबद्दल ६५ लोकांना अटक केली आहे, असंही निवेदनात सांगितलं आहे.

मणिपूर राज्यात ३ मे रोजी हिंसाचार सुरू झाल्यापासून एकूण ४,०१४ जाळपोळीच्या घटना घडल्याची माहितीही सरकारने दिली आहे. सरकारने लोकांना हिसकावलेली शस्त्रे आणि दारूगोळा आत्मसमर्पण करण्याचं आवाहन केलं आहे. । पान २ वर

## टाटा समूह गुजरातमध्ये १३ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करणार, लिथियम आयन सेल प्रकल्प उभारणार

मुंबई : टाटा समूह गुजरातमध्ये १३ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे. टाटा समूहाने गुजरात सरकारसोबत एक सामंजस्य करार केला आहे, ज्याअंतर्गत टाटा समूह राज्यात लिथियम आयन सेल मॅन्युफॅक्चरिंग गिगा कारखाना उभारणार आहे. टाटा समूहाची उपकंपनी असलेल्या अग्रतास एनर्जी स्टोअरेज सॉल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेडने गुजरात सरकारसोबत हा करार केला आहे.



प्रस्तावित गीगा कारखाना हा भारतातील पहिला लिथियम–आयन सेल उत्पादन कारखाना असेल. पहिल्या टप्प्यात २० ऋथह च्या उत्पादन क्षमता आणि सुमारे १३,००० कोटी रुपयांच्या प्रारंभिक गुंतवणुकीसह कंपनी इथे निर्मिती प्रकल्प उभारणार आहे. या सामंजस्य करारावर अग्रतास एनर्जी स्टोअरेज सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेडचे सीईओ विजय नेहरा आणि गुजरात सरकारचे विज्ञान आणि तंत्रज्ञान सचिव यांनी मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांच्या उपस्थितीत स्वाक्षरी केली आणि देवाणघेवाण केली.

टाटा समूहाने हा प्रकल्प इथे सुरु केल्याने गुजरात हे लिथियम–आयन सेल उत्पादनात आघाडीचे राज्य म्हणून स्थापित होईल आणि राज्यातील बॅटरी उत्पादनाच्या विकासाला हातभार लावेल. या गीगा कारखान्याच्या स्थापनेने २०३० पर्यंत देशात ५०% कार्बन उत्सर्जन मुक्त ऊर्जा आणि १००% इलेक्ट्रिक वाहन वापराचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी गुजरातला एक नवीन दिशा । पान २ वर

श्री मंगेश मेमोरियल इंटरनॅशनल स्कूल दौंड या शाळेत

संविधान शरणबसपा सोनकांबळे

दहावी परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवून उत्तीर्ण झाल्याबद्दल..



हार्दिक अभिनंदन



शुभेच्छुक : कमलाकर सोनकांबळे

उपसरपंच ग्रामपंचायत गोगांव

सिद्धार्थ सोशल फाउंडेशन महाराष्ट्र राज्य

## * सुविचार *

शिक्षण म्हणजे मानवाच्या अंगी जे सुप्त पूर्णत्व आहे, त्याचेच प्रकटीकरण होय.- स्वामी विवेकानंद

## संपादकीय

### त्यावरील महत्त्वाचा उपाय...

देशामधील प्रत्येक शेतकरी आपापल्या हिशोबाने हव्या त्या शेतमालाला प्राधान्य देतो. त्यामुळे काही बाबतीत देश गरजेपेक्षा अधिक उत्पादन करतो, तर काही शेतमालाची मोठ्या प्रमाणावर आयात करणे भाग पडते. कृषी धोरण आखताना शेतकऱ्यांना विश्वासात घेतले न गेल्यामुळे ही स्थिती उद्भवते. देशात यंदा विक्रमी म्हणजे ३३०.५ दशलक्ष टन अन्नधान्य उत्पादन झाल्याचा अंदाज केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाने व्यक्त केला आहे. शेतकऱ्यांच्या कठोर मेहनतीचे हे फळ आहे, या कष्टाचा अभिमान प्रत्येक भारतीयाने बाळगलाच पाहिजे. कमी पाऊस किंवा दुष्काळासारख्या स्थितीचे अपवाद सोडल्यास देशात अन्नधान्यांसह शेतीमालाच्या उत्पादनाचा वाढीचा कल कायम राहिला, हे खरे असले, तरी वाढत्या लोकसंख्येसाठी शेतीमालाचे अधिक उत्पादन घेण्यासाठी सिंचनाच्या पुरेशा व्यवस्था निर्माण करता आल्या नाहीत. त्यामुळे केवळ मोसमी पावसावर अवलंबून शेती करणाऱ्या या देशात बारमाही पुरेसे पाणी उपलब्ध होत नाही. अशाही अवस्थेत शेतकऱ्यांनी विक्रमी उत्पादन करणे ही बाब महत्त्वाची मानायला हवी. अन्नधान्याच्या बाबतीत मोठ्या प्रमाणात स्वयंपूर्णता प्राप्त करण्यासाठी गेल्या पाच दशकांत जे प्रयत्न झाले, त्याचे हे फळ आहे. तरीही, अन्नधान्य उत्पादनाचा लाभ शेवटच्या नागरिकापर्यंत पोहोचवण्यात फार मोठे यश मिळत नसल्याचे चित्र फारसे आशादायक नाही. लागवडीखालील जमिनीत सतत होणारी घट हे शेती उत्पादनात वाढ करण्यातले आजचे आव्हान. त्याला एकरी उत्पादन वाढ करणे एवढाच पर्याय असू शकतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी पिकविलेल्या अन्नधान्याची नासाडी कमीत कमी होणे अधिक गरजेचे आहे. 'असोचॅम' या उद्योग संघटनांच्या संघाने २०१६ मध्ये वर्तविलेल्या एका अंदाजानुसार, एका वर्षांत सुमारे ९२६ अब्ज किमतीचे अन्नधान्य काढणीनंतर वाया जाते. वितरण प्रक्रियेतील अनागोंदी, अन्न वेळेत तयार न होणे, अन्नधान्य वेळेत न पोहोचणे आणि तयार केलेल्या अन्नाला खाण्यास नकार देणे, अशा किरकोळ कारणांतून ही नासाडी होत आहे. यापूर्वी चीन लोकसंख्या आणि अन्नधान्य उत्पादन दोन्हीतही पहिल्या क्रमांकावर होता. आता भारत लोकसंख्येच्या बाबत जगात पहिल्या क्रमाकांवर आणि अन्नधान्य उत्पादनात पहिल्या पाच क्रमांकांत आहे. म्हणजे भारताचा लोकसंख्यावाढीचा वेग लक्षात घेता, काहीच वर्षांत अन्नधान्याच्या बाबतीत असलेली स्वयंपूर्णता धोक्यात येण्याची शक्यता गृहीत धरायला हवी. खाद्यान्न सुरक्षित ठेवण्यासाठी गोदामे व शीतसाखळी आणि तेथील मालाचे शेवटपर्यंत सुरक्षित पोहोचणे ही अन्नधान्य प्रक्रियेतील सर्वात महत्त्वाची साखळी अधिक सक्षम करणे हा त्यावरील महत्त्वाचा उपाय.

पान १ वरुन

## एका झटक्यात २३३ जणांचा मृत्यू

माहिती मिळत आहे. यातील ७ डब्बे उलटले असून रेल्वे रुळ तुटल्यानं ४ डब्बे बाहेर आले आहेत. या अपघातात आतापर्यंत २३३ जणांचा मृत्यू झाला.

अपघाताबाबात रेल्वे प्रशासनाचं निवेदन

रेल्वेनं एका निवेदनात म्हटलं आहे की, ट्रेन क्रमांक १२८४१ चेन्नई सेंट्रलहून शालीमारला जात होती. २ जून रोजी दुपारी ३.३० वाजता ही गाडी शालिमारकडे रवाना झाली होती. खरगपूर विभागांतर्गत बहनगा बाजार रेल्वे स्थानकाजवळ रात्री ८.३० वाजता रेल्वे रुळावरुन घसरली. अप आणि डाऊन दोन्ही गाड्यांच्या वाहतुकीवर परिणाम झाला आहे.

अपघात नेमका झाला कसा?

बहनागा स्टेशनजवळ ङ्चतइ-हावडा एक्स्प्रेस (१२८६४), कोरोमंडल एक्सप्रेस आणि मालगाडीची टक्कर झाली. प्रथम हावडा एक्स्प्रेस मालगाडीला धडकली, त्यानंतर मालगाडी कोरोमंडलला धडकली.

हावडा-चेन्नई कोरोमंडल एक्प्रेसचे काही डबे रुळावरून घसरले होते. यात कुठलीही जीवितहानी झाली नव्हती. मात्र काही क्षणांतच या घसरलेल्या डब्यांवर समोरून येणारी मालगाडी धडकली, आणि मग मृत्यूचं तांडवच सुरू झालं. यशवंतपूर-हावडा सुपरफास्ट ट्रेनच्या चालकाला जवळच घडलेल्या अपघाताबाबत माहित नसावं. म्हणून त्याची ट्रेन पूर्ण वेगात होती. आणि हीच ट्रेन घसरलेल्या डब्यांवर जाऊन आदळली.

## छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याचे

राज्य कसे करावे, हे शिवरायांनी जगाला शिकविले. शिवराय न्यायप्रिय राजे म्हणून अजरामर आहेत. दिल्लीतही शिवरायांचा भव्य पुतळा उभारला पाहिजे, अशी मागणी राज्याच्यावतीने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडे करणार असल्याचे त्यांनी सांगितले. छत्रपती शिवाजी महाराजांनी साडेतीनशे वर्षांपूर्वी केलेली कामे आजही आम्हाला आदर्शवत आहेत. त्यांच्या राज्याभिषेकाने नवी नाणी तयार करण्यात आली, गडकिल्ल्यांना नवे अस्तित्व मिळाले. छत्रपतींची राजमुद्रा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नौदलाच्या ध्वजावर आणली आहे, आता छत्रपती शिवाजी महाराजांचे राष्ट्रीय स्मारक राजधानी नवी दिल्ली येथे झाले पाहिजे, अशी मागणी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडे राज्याच्या वतीने करणार असल्याचे उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

## प्रति थेंब अधिक पीक

शेती हा निसर्गाच्या भरवशावर चालणारा व्यवसाय आहे, असे म्हटले जाते. निसर्गाच्या बेभरवशावर मात करण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या सिंचन व शेततळे यासारख्या योजना

मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजना ठिबक सिंचन योजनेची खर्च मर्यादा :

| अ.क्र | अंतर (मि.मी.मध्ये) | क्षेत्र ०.२ हे. | क्षेत्र ०.४ हे. | क्षेत्र १ हे. |
|---|---|---|---|---|
| १ | १.२X ०.६ | ३१४३६ रू. | ५७२४१ रू. | १२७५०१ रू. |
| २ | १.८X ०.६ | २४५६९ रू. | ४२९९२ रू. | ९१५६० रू. |
| ३ | १.५ X१.५ | २८१०६ रू. | ४६९९५ रू. | ९७२४५ रू. |
| ४ | ३ X ३ | १५७९२ रू. | २६१९० रू. | ४७७५१ रू. |

मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजना तुषार सिंचन खर्च मर्यादा :

| क्षेत्र | पाईपचा व्यास (Pipe Dia) मि. मी. मध्ये ६३ | ७५ | ९० |
|---|---|---|---|
| ०.४ हे.पर्यंत | १३२११ रू. | लागू नाही | लागू नाही |
| १ हे. पर्यंत | २१५८८ रू. | २४१९४ रू. | ० |
| २ हे. पर्यंत | ३११६७ रू. | ३४६५७ रू. | ० |
| ३ हे. पर्यंत | लागू नाही | लागू नाही | ४६७७९ रू. |
| ४ हे. पर्यंत | लागू नाही | लागू नाही | ५८९९५ रू. |
| ५ हे. पर्यंत | लागू नाही | लागू नाही | ६६७८९ रू. |

शेतकऱ्यांच्या मदतीला आल्या आहेत. राष्ट्रीय कृषि विकास योजनाअंतर्गत प्रति थेंब अधिक पीक हे ध्येय घेऊन या योजना काम करतात. या योजनांची माहिती या लेखात देण्यात आली आहे.

मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजना ठिबक सिंचन व मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजना तुषार सिंचन या दोन्ही योजनांचा उद्देश सिंचनाखालील लागवडीयोग्य क्षेत्र वाढविणे, उपलब्ध पाण्याची कार्यक्षमता वाढविणे, पिकांच्या उत्पादनात व शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणे, हा आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी सर्व खातेदार शेतकरी पात्र लाभार्थी आहेत. मात्र, त्यांनी यापूर्वी त्याच क्षेत्रावर मागील ७ वर्षांत लाभ घेतलेला नसावा. यासाठी पाण्याचा स्त्रोत आवश्यक असून, ७/१२, ८ अ चा उतारा, संवर्ग प्रमाणपत्र (एससी, एसटीसाठी) ही कागदपत्रे आवश्यक आहेत.

दोन्ही योजनांसाठी अनुदान : अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना खर्च मर्यादेच्या ८० % व इतर शेतकऱ्यांना खर्च मर्यादाच्या ७५% अनुदान देय आहे. प्रधानमंत्री सूक्ष्म सिंचन योजनेतून ५५% / ४५% व उर्वरित पूरक अनुदान मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजना २५% / ३०% देय आहे.

मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेअंतर्गत वैयक्तिक शेततळे –

या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदार शेतकऱ्याकडे स्वतःच्या नावावर किमान ०.६० हेक्टर क्षेत्र असणे आवश्यक असून, ती जमीन शेततळे खोदण्यास तांत्रिकदृष्ट्या योग्य असणे आवश्यक आहे. अर्जदार शेतकऱ्यांनी यापूर्वी मागेल त्याला शेततळे, सामूहिक शेततळे अथवा भात खाचरातील बोडी किंवा इतर कुठल्याही शासकीय योजनेतून शेततळे या घटकाकरिता शासनाच्या अनुदानाचा लाभ घेतलेला नसावा. या योजनेसाठी उपलब्ध अनुदानाच्या प्रमाणात संगणकीय प्रणालीतून होणाऱ्या सोडतीनुसार लाभ देण्यात येतो.

शेततळ्यासाठी आकारमान : या योजनेअंतर्गत शेततळ्याच्या आकारमानानुसार देय होणारी अनुदानाची रक्कम निश्चित करण्यात आली आहे. अनुदानाची कमाल रक्कम रुपये ७५००० इतकी राहील. त्यापेक्षा जास्त खर्च झाल्यास सदर अतिरीक्त खर्च संबंधित लाभार्थीने स्वतः करणे अनिवार्य राहील.

**आकारमान व अनुदान**

| अ.क्र | आकारमान | प्रकल्प खर्च रक्कम रूपये | अनुदान रक्कम रू. |
|---|---|---|---|
| 1 | 15x15x3 | 56551/- | 28275/- |
| 2 | 20x15 x 3 | 63196/- | 31598/- |
| 3 | 20x20x3 | 82436/- | 41218/- |
| 4 | 25x20x3 | 99342/- | 49671/- |
| 5 | 25x25 x 3 | 117399/ | 58700/- |
| 6 | 30x25 x 3 | 135457/- | 67728/- |
| 7 | 30x30x3 | 156127/- | 75000/- |

अर्ज सादर करण्याची पद्धत : अर्ज करण्याची प्रक्रिया सुरू असून महाडीबीटी पोर्टलचे र्हीींिं://ारहरवलींरहळीं.सीं.ळप या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज सादर करावा, शेतकरी स्वतःचा मोबाईल, संगणक, लॅपटॉप, टॅबलेट, सामुदायिक सेवा केंद्र उडउ ग्रामपंचायतमधील संग्राम केंद्र यासारख्या माध्यमातून संकेतस्थळावर जाऊन अर्ज करु शकतील.

**एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान अंतर्गत वैयक्तिक शेततळे अस्तरीकरण** – फलोत्पादन पिकांसाठी संरक्षित सिंचन सुविधा निर्माण करणे, दुष्काळी भागांमध्ये फलोत्पादन पिकांच्या क्षेत्र विस्तारासाठी सिंचन सुविधा निर्माण करणे हा या योजनेचा उद्देश आहे. यासाठी मनरेगा, आरकेव्हीव्हाय, मागेल त्याला शेततळे, इतर योजना व स्वखर्चाने खोदकाम केलेल्या तळ्यांना प्लास्टीक अस्तरीकरण करणारे शेतकरी हे पात्र लाभार्थी आहेत. तर ७/१२, ८ अ, आधार कार्ड छायांकित प्रत, आधार संलग्न बँक खात्याचा पासबुकच्या प्रथम पानाची छायांकित प्रत, संवर्ग प्रमाणपत्र (अनु.जाती व अनु.जमाती प्रवर्गाकरिता) ही कागदपत्रे आवश्यक आहेत.

एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान (सामूहिक शेततळे) –

फलोत्पादन व (फळे, फुले, भाजीपाला, मसाला पिके ई.) पिके असणारे संबंधित शेतकरी समूह या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र आहेत. त्यासाठी ७/१२, ८ अ चा नमुना, आधार कार्डची छायांकित प्रत, आधार संलग्न राष्ट्रीयकृत बँक खाते पास बुकच्या प्रथम पानाची छायांकित प्रत, हमीपत्र, संवर्ग प्रमाणपत्र ( अनु. जाती व अनु. जमाती करिता ) ही कागदपत्रे आवश्यक आहेत.

३४ ु ३४ ु ४.७० मीटर आकारमानाच्या सामूहिक शेततळ्यासाठी रक्कम रूपये ३.३९ लाख असे १०० टक्के अनुदान आहे. २४ ह्न २४ ह्न ४ मीटर आकारमानाच्या सामूहिक शेततळ्यासाठी रक्कम रूपये १.७५ लाख असे १०० टक्के अनुदान आहे.

अधिक माहितीसाठी तालुका कृषि अधिकारी, मंडळ कृषि अधिकारी, कृषि सहाय्यक यांच्याशी संपर्क करावा.

**(संकलन – उपमाहिती कार्यालय, पंढरपूर)**

छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार सर्वदूर पोहोचविण्याचा संकल्प : सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार

यावेळी मंत्री श्री. मुनगंटीवार म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचार मनामनात पोहोचवण्याचा संकल्प आपण केला आहे. यापुढील काळात किल्ले रायगडावर साजऱ्या होणाऱ्या शिवराज्याभिषेक सोहळ्यासाठी राज्य शासन खंबीरपणे शिवराज्याभिषेक समितीच्या पाठीशी राहिल. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील जगदंब तलवार देशात आणण्याचा आपण प्रयत्न करत आहोत. महाराजांच्या जीवनावरील गॅझेटीयर सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने प्रकाशित करण्यात आले. याशिवाय, तंजावर येथे छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक बनविण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. नवी दिल्ली येथील जवाहरलाल नेहरू विद्यापीठात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारांचा अभ्यास होण्यासाठी पाच कोटी रुपये दिले असल्याची माहिती त्यांनी दिली.

खासदार छत्रपती उदयनराजे भोसले म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेचे राज्य निर्माण केले. त्याचा आदर्श जगभरातील लोकशाही मानणाऱ्या देशांनी घेतला आहे.शिवराज्याभिषेक दिनाच्या ३५० व्या वर्ष सोहळ्यानिमित्त राज्यभर वर्षभरात विविध कार्यक्रम होणार असून त्याचा प्रारंभ १ जूनपासून करण्यात आला आहे.शिवराज्याभिषेकाच्या मुख्य सोहळ्यानंतर मुख्यमंत्री श्री. शिंदे उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस व इतर सर्व मान्यवर यांनी जगदीश्वर मंदिर येथे जाऊन जगदीश्वराचे तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीचे दर्शन घेतले. होळीचा माळ येथे उपस्थित राहून त्यांनी मर्दानी खेळांचे प्रात्यक्षिक, ढोलपथकांचे सादरीकरण पाहिले.

तिथीप्रमाणे ३५० व्या शिवराज्याभिषेक वर्षाच्या दिवशी आज सकाळी ध्वज पूजन, पालखी प्रस्थान त्याचबरोबर ध्वजारोहण तत्पूर्वी झाले.सकाळी साडेआठ वाजता मुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व इतर मान्यवरांच्या हस्ते सप्तसिंधू जलाभिषेक, सिंहासनारोहन मुद्राभिषेक हे विधी करण्यात आले.या कार्यक्रमाच्या निमित्ताने सामूहिक राज्यगीत म्हटले गेले. त्यानंतर शासकीय पोलिस मानवंदनाही देण्यात आली.

## टाटा समूह गुजरातमध्ये १३ हजार

दिली आहे.दरम्यान हा प्रकल्प इलेक्ट्रॉनिक वाहन उद्योगाच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान देईल आणि १३,००० हून अधिक व्यक्तींसाठी प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी निर्माण करेल, असं म्हटलं जात आहे.

देशातील लिथियम-आयन बॅटरीची वाढती मागणी पूर्ण करणं हा या निर्मिती प्रकल्पाचा उद्देश आहे. सरकारकडून देशात इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढवण्यावर जोर दिला जात असतानाच या प्रकल्पाच्या निर्मितीची घोषणा करण्यात आली. या प्रकल्पामुळे राज्यात मोठ्या प्रमाणाात रोजगार उपलब्ध होती, अशी आशा गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांनी व्यक्त केली आहे. सोबतच या प्रकल्पामुळे राज्यात लिथियम-आयन बॅटरीच्या निर्मितीसाठी एक इकोसिस्टम निर्माण करण्यात मदत होईल, असंही त्यांनी म्हटलं.

त्यांनी ट्वीटमध्ये लिहिलं आहे की, गुजरातमध्ये देशातील पहिला लिथियम-आयन सेल उत्पादन करणारा गिगा कारखाना सुरु करण्यासाठी राज्य सरकार आणि टाटा समूह यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. राज्याच्या नवीन इलेक्ट्रॉनिक्स धोरणाचे फलित असलेल्या या सामंजस्य करारांतर्गत पहिल्या टप्प्यात १३ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसह २० ऋध्र क्षमतेचा प्लांट उभारला जाईल, ज्यामुळे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण होतील.इलेक्ट्रिक वाहनांचे उत्पादन वाढवून कार्बन उत्सर्जन कमी करण्याच्या दृष्टीकोनासाठी राज्य सरकार वचनबद्ध आहे. इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढल्याने लिथियम-आयन बॅटरीची मागणीही वाढेल. या प्रकल्पामुळे राज्यात लिथियम-आयन सेल मॅन्युफॅक्चरिंग इकोसिस्टम स्थापना होण्यास मदत होईल.

## मणिपूर हिंसाचारात सुमारे ९८..

सरकारने निवेदन जारी करत म्हटलं आहे की, कोणत्याही व्यक्तीला हिसकावून घेतलेली शस्त्रास्त्रे आणि दारूगोळ्यासह पकडले गेल्यास त्याच्यावर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल. आतापर्यंत, सुरक्षा यंत्रणांनी १४४ शस्त्रे जप्त केली आहेत.

मणिपूरमध्ये गेल्या महिन्यात सुरू झालेला हिंसाचार आता हळूहळू कमी होताना दिसत आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या आवाहनानंतर लोकांनी मणिपूरच्या विविध ठिकाणांहून शेकडो शस्त्रे परत केली आहेत. शाह यांनी मणिपूर दौऱ्यात शस्त्रे समर्पण करण्याचं आवाहन केलं होतं. या आवाहनाला प्रतिसाद राज्यातील विविध ठिकाणी लोकांनी १४० शस्त्रांचं पोलिसांनी समर्पण केलं आहे.

नागरिकांकडून १४० शस्त्रास्त्र समर्पण

मणिपूर पोलिसांनी सांगितलं की, नागरिकांनी आत्मसमर्पण केलेल्या १४० शस्त्रांमध्ये एसएलआर २९ (डङठ २९), कार्बाइन, एके, इनसास रायफल, इनसास एलएमजी (खपीरी ङचक्ष), ३०३ रायफल, ९ एमएम पिस्तूल, ३२ पिस्तूल, एम १६ रायफल, स्मोक गन आणि अश्रुधूर, स्थानिक बनावटीचे पिस्तूल, स्टन गन, रायफल, जेव्हीपी आणि जेव्हीपी ग्रेनेड लाँचर या हत्यारांचा समावेश आहे.

## आता महसूल विभागातील दलाल

प्रणाली वापरण्याचा निर्णय महाआयटीकडून (च-क--खढ) घेण्यात आला आहे. तसेच या निर्णयाची अंमलबजावणी देखील सुरू करण्यात आली आहे. या प्रणालीमुळे आता प्रमाणपत्र मिळणे सोयीचे होणार आहेच परंतु सामान्य नागरिकांची दलाल प्रवृत्तीमधून सुटका होण्याची अपेक्षा देखील वर्तवण्यात आली आहे. या प्रणालीच्या माध्यमातून प्रथम अर्ज करण्यात आलेल्या व्यक्तीचे काम आधी करण्यात येणार आहे. संपूर्ण राज्यात ही प्रणाली लागू करण्यात आली असून वर्ध्यात देखील त्याची अंमलबजावणी करण्यात आली आहे.

आपले सरकार या संकेतस्थळावर अथवा ऑनलाइन सरकारी केंद्रावरून प्रमाणपत्रासाठी अर्ज केला जातो. विविध डेस्कच्या माध्यमातून हे अर्ज निकाली काढण्यात येतात. याआधी अर्ज केल्यावर प्रमाणपत्र मिळण्यासाठी विलंब होत होता. आधी अर्ज केला असताना देखील मधल्याच माणसाला प्राधान्य मिळायचे. दलाल प्रवृत्तीमुळे नंतर केलेला अर्ज देखील निकाली लागत होता. दलाला मार्फतच काम लवकर होते, अशी समज नागरिकांची झाली होती. याला कुठे तरी आळा बसला पाहिजे यासाठी शासनस्तरावर प्रयत्न करण्यात येत होते. त्यामुळे आता 'फर्स्ट इन फर्स्ट आउट' या प्रणालीमुळे या प्रकाराला आळा बसणार असल्याचं शासन अधिकाऱ्यांकडून सांगण्यात येत आहे.

फिफो प्रणालीनुसार तारिख आणि वेळेनुसार प्रथम येणारा अर्ज स्वीकारला किंवा नाकारला जाणार आहे. क्लार्क, अव्वल कारकून अथवा नायब तहसिलदार आणि तहसिलदार अथवा उपजिल्हाधिकारी अशा तीन टप्प्यामधून प्रमाणपत्राचे अर्ज पुढे जात असतात. फिफो प्रणालीमुळे कुणालाही अतिरिक्त पैसे देण्याची गरज पडणार नाही. आधी आलेल्या अर्जावर आधी विचार आता करण्यात येणार आहे. फिफो प्रणालीमुळे प्रमाणपत्र मिळण्याची पद्धत तांत्रिकदृष्ट्या सक्षम होत असल्याचे चित्र आहे.रहिवासी प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलेअर, जेष्ठ नागरिक, अल्पभूधारक अशा विविध प्रमाणपत्रासाठी कालावधी ठरवून देण्यात आला आहे. यासाठी आकारण्यात येणारे शुल्क देखील ठरवून देण्यात आले आहे. वर्ध्यासह इतर जिल्ह्यात देखील या फिफो प्रणालीच्या अंमलबजावणीला सुरुवात करण्यात आली. नागरिकांना प्रमाणपत्र मिळणे आता सुलभ झाले आहे. आधी अर्ज करणाऱ्यांना आधी प्राधान्य दिले जाणार आहे. ररश्रिशीरीज्ञरी.ारहरेपश्रळपश.सीं.ळप यावर ही प्रणाली उपलब्ध आहे. त्यामुळे नागरिकांनी देखील दलाल प्रवृत्तीला बळी न पडता याचा लाभ घ्यावा असे आवाहन महाआयटीचे वर्धा जिल्हा व्यवस्थापक प्रतीक उमाटे यांनी केले आहे.

## देशात व राज्यात परिवर्तनाचे चित्र

काँग्रेसला मानणाऱ्यांची संख्या मोठी आहे. यावेळी काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना यांची महाविकास आघाडी म्हणून आम्ही निवडणुकांना सामोरे जात आहेत. भाजपाला जो पराभूत करु शकेल त्यालाच उमेदवारी दिला जावी असा एकंदर सुरू आहे. मविआने एकास एक उमेदवार दिला तर भाजपाचे पानिपत करणे सोपे जाईल. भाजपाच्या हुकुमशाही, मनमानी व अत्याचारी सरकारला जनता कंटाळली आहे. जनतेला बदल हवा आहे, देशात परिवर्तनाचे वारे वाहत असून यावेळी राज्यात व दिल्लीतही बदल होईल हे चित्र आहे, असंही त्यांनी सांगितले.

## हत्तीकणबस ता. अक्कलकोट येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला पुरस्कार सोहळा संपन्न

अक्कलकोट/प्रतिनिधी : मौजे हत्तीकणबस ता. अक्कलकोट येथील ग्रामपंचायत तर्फे उत्कृष्ट कार्य करणाऱ्या सौ. ज्योती श्रीशैल बिराजदार व श्रीमती नागाबाई चंद्राम बंदिछोडे यांना मुख्याध्यापक , केंद्रप्रमुख इस्माईल मुर्डी सर, समाजसेविका मंगला पाटील, ग्रामसेवक श्री. वंजारी साहेब यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष सरपंच श्री. श्रीशैल माळी, श्री. शिवनिंगप्पा म्हेत्रे, ग्रा. पं. सदस्य श्री. गुरु उण्णद, श्री. श्रीशैल चंद्रकांत बिराजदार, बसवराज अंकलगे, शरणप्पा पाटील-चेअरमन,सोमनाथ उण्णद, महादेव उण्णद, महादेव बिराजदार, विठ्ठल पाटील, चिदानंद गाडेकर, सचिन कलकोटे, मारुती गाडेकर, रेवणप्पा गाडेकर तंटामुक्ती समिती उपाध्यक्ष, ग्रा. पंचायत कर्मचारी- गणपती बबलाद, रवी पाटील, निंगप्पा घोडके व पुरस्कार मिळालेले सौ. ज्योती श्रीशैल बिराजदार- बालाजी बचत गट- आय. सी. आर. पी. व श्रीमती नागाबाई चंद्राम बंदिछोडे समाजसेविका सौ. रेखा सिद्राम वाघमोडे- जीवन बचत गट अध्यक्ष, सौ. मुक्ताबाई हणमंत बिराजदार- जीवन बचत गट सचिव, सौ. संगिता सुरेश हिरापुरे-जीवन बचत गट सचिव, सौ. गंगाबाई महांतप्पा बिराजदार जीवन बचत गट बी. के., सौ. रेखा श्रीशैल उण्णद- जय सदगुरू गट सचिव, सौ.पूजा रवि पाटील-जय सदगुरू गट अध्यक्ष, सौ. करिश्मा शिवानंद तळवार- स्वामी समर्थ गट सचिव, सौ. चन्नम्मा अण्णप्पा बिराजदार जीवन गट सदस्य,

सौ. रमा शंकर शिंदे बालाजी गट सदस्य, सौ. मंदाबाई शंकर बिराजदार- बालाजी गट सदस्य व सौ. वंदना शिवराया हिरापुरे - स्वामी समर्थ गट अध्यक्ष व अनेक माता भगिनी उपस्थित होते. सर्वांनी मनोगत व्यक्त करून शुभेच्छा दिल्या व पुरस्कार मिळालेल्यांचे कौतुक करण्यात आले.

याप्रसंगी ग्रामसेवक श्री. वंजारी साहेब यांनी स्वच्छ भारत मिशन व १५ मे ते १५ ऑगस्ट २०२३ पर्यंत कचरामुक्त गांव अभियान राबविण्यास उपस्थितांना मार्गदर्शन केले. शेवटी आभार प्रदर्शन प्रसंगी केंद्रप्रमुख श्री. इस्माईल मुर्डी सर यांनी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. अशा प्रकारे खेळीमेळीच्या वातावरणात कार्यक्रम संपन्न झाला.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinewsgmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# पिराची कुरवलीच्या नऊ सभासदांनी काळे यांच्या घरासमोर येऊन ताकद दाखवली



पंढरपूर/प्रतिनिधी : मागील काही दिवसापासून सहकार शिरोमणी चे संचालक बाळासाहेब कौलगे यांनी उपरी येथील बैठकीमध्ये चेअरमन अभिजीत पाटील यांच्या गटात प्रवेश केल्याची धक्कादायक गोष्ट पहावयास मिळाली हा झालेला प्रवेश निव्वळ फुसका बार आहे हे दाखवून देण्यासाठी पिराजी कुरोली गावातील मतदार सभासद यांनी चेअरमन काळे यांच्या निवासस्थानी गुरुवारी सकाळी येऊन आम्ही अजूनही तुमच्याच पाठीशी आहोत हे दाखवून देण्यासाठी मोठी शक्ती प्रदर्शन दाखवले आहे

यामुळे या गावातील मागील अनेक वर्षातील काळे घराण्याची संबंध कायम असल्याचे दाखवून दिले आहे स्वर्गीय वसंतदादा काळे यांच्या राजकीय कारकीर्दी पासून पिराची कुरोली या गावावर विशेष प्रेम आहे

या गावाने आजवर काळे यांच्या शब्दाला मोठी किंमत दिली आहे तीच परंपरा आजवर आहे त्याचाच एक भाग म्हणून पिराची कुरोली येथील मतदार सभासद यांनी स्वखर्चाने चार चाकी वाहनाच्या ताब्यामधून शेकडो सभासद यांनी अचानक चेअरमन काळे यांच्या पंढरपूर येथील निवासस्थानी येऊन पाठिंबा देण्याची बैठक घेतली त्यामुळे काळे कुटुंब भारावून गेले आहे संचालक बाळासाहेब कोल्हे यांनी जो पाटील गटात प्रवेश केला आहे तू आम्हाला मान्य नसल्याचा खुला आह

` खुलासा अनेक सभासदांनी व्यक्त केले त्यांना गावातील किती सभासद स्वीकारतील हे मतमोजणी दिवशी नक्कीच समजणार आहे त्यांनी केलेली चूक महाग पडणार असल्याचे गावातील सभासदांनी व्यक्त केली

# बुध्दांचा शांतीचा विचारच जगाला तारणारा आहे : केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

## संयुक्त राष्ट्रसंघातर्फे बँकॉक येथे बुध्दपोर्णिमा उत्सवास प्रारंभ



बँकॉक/मुंबई : सम्राट अशोक यांनी कलिंगमध्ये केलेले युध्द अत्यंत घनघोर होते. त्यातुन झालेला रक्तपात आणि मांसाचा चिखल मृत सैनिकांचे हंबरडे फोडुन रडणे हे दृश्य पाहुन सम्राट अशोक यांचे हृदय विदीर्ण झाले त्यांना पश्चाताप झाला. ते मनाची शांती शोधु लागले. मन शांतीच्या शोधात असतांना त्यांना बौध्द धम्माचा मार्ग मिळाला. अशा पध्दतीने सम्राट अशोकाचे मन युध्दाकडुन बुध्दाकडे वळले. प्रियदर्शी सम्राट अशोकाने बौध्द धम्माचा प्रसार संपूर्ण भारत आणि जगभर केला. बुध्दांचा शांतीचा विचारच जगाला तारणारा आहे असे प्रतिपादन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केले.

संयुक्त राष्ट्र संघ (युनो) थायलंड मधील बँकॉकच्या युनोच्या सेंटरमध्ये बुध्दपोर्णिमा महोत्सव आणि आंतरराष्ट्रीय बौध्द धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. बँकॉक येथील महाचिलाँग कॉर्न राजा युनिव्हर्सिटी येथील सभागृहात या बौध्द धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या बौध्द धम्म परिषदेला प्रमुख अतिथी म्हणुन केंद्रीय राज्यमंत्री ना. रामदास आठवले उपस्थित राहिले आहेत.

त्यांच्या समवेत युनायटेड बुध्दीस्ट फेडरेशनचे अध्यक्ष अविनाश कांबळे, बहुजन विद्यार्थी परिषदेचे अध्यक्ष चंद्रशेखर कांबळे, भिमराव सावतकर, नितीन गजभिये; सिद्धार्थ हत्तीआंबीरे; हे प्रतिनिधी बॅकॉक येथे बौध्द धम्मपरिषदेला उपस्थित राहिले आहेत. सद्या रशिया आणि युक्रेन यांचे युध्द सुरु आहे. युध्दामुळे जगाचे नुकसान होत आहे. युध्दामुळे कोणाचेही कल्याण होणार नाही. बौध्द धम्मामुळेच जगाचे कल्याण होणार आहे. जगाने युध्दाचा नाही तर बुध्दाचा विचार करावा. जगात उद्भवणा-या अनेक समस्यांवर मात करण्यासाठी भगवान बुध्दांनी दिलेल्या शांती, अहिंसा या तत्वांचा पुरस्कार करावा. या विचाराने आपण आंतरराष्ट्रीय बौध्द धम्मपरिषदेला उपस्थित राहिलो असल्याची माहिती ना. रामदास आठवले यांनी दिली.

# पुजारी यांना डायरेक्टर पदवी व सौ.पूर्वा पुजारी यांना अहिल्यादेवी होळकर पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल सत्कार

पत्रकार नामदेव निर्मळे

घोसरवाड तालुका शिरोळ येथील जानकी वृद्धाश्रमाचे अध्यक्ष मा.बाबासाहेब पुजारी इंटरनॅशनल युसी एज्युकेशन कौन्सिल फ्रान्स विद्यापीठाच्या सामाजिक कार्याबद्दल डायरेक्ट पदवी सन्मान करण्यात आला. या वृद्धाश्रमातून एकूण ५२ जणांची सेवा करण्याचे लाभ त्यांना मिळाला आहे. आपल्या सामाजिक कार्यातून त्यांनी मानवता धर्म अजून टिकून आहे. याची शिकवण दिली आहे. व यांची सौभाग्यवती पूर्वा पुजारी यांना महाराष्ट्र शासन महिला व बालविकास विभाग यांच्यामार्फत देण्यात येणारा यंदाचा २०२३ पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार देऊन त्यांना गौरव करण्यात आला. वृद्धाश्रम मध्ये अनाथांची सेवा करण्यामध्ये यांचा मोठा मोलाचा वाटा आहे. घरचे सभासद आहेत असे समजून ही सेवा केली जाते. यांचा सत्कार करताना माजी सुभेदार व विद्यमान महात्मा गांधी तंटामुक्त अध्यक्ष केंदबा कांबळे, माजी ऑर्नरी कॅप्टन रमेश निर्मळे, वीट उद्योजक संजय कुंभार, माजी सैनिक नंदकुमार कांबळे, उद्योजक संजय लोहार, पत्रकार नामदेव निर्मळे आदींनी सत्कार करून यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे.




**जानकी वृद्धाश्रम चे संस्थापक बाबासाहेब पुजारी यांना डायरेक्ट पदवी व सौ पूर्वा पुजारी यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल सत्कार करताना सैनिक असोसिएशन**

# सैनिक टाकळीतील आकांक्षा विजय पाटील घवघवीत यश



सैनिक टाकळी/संजय चव्हाण : शिरोळ तालुक्यातील सैनिक टाकळी येथील आंकाशा विजय पाटील हिने ९८.२०%इतके गुण मिळवून सैनिकटाकळीची व तिच्या वडिलांचे नाव रोशन केले आहे. विजय पाटील हे एक प्रगतशील शेतकरी आहेत. त्यांची मुलगी आकांक्षा हिने दहावी मध्ये ९८.२०% गुण मिळवले आहेत त्यासाठी ना एक्स्ट्रा तास ना कोचिंग क्लासेस इंग्रजी माध्यमातून यश मिळवले आहे. आकांशा हिचे घर मळा वस्तीमध्ये शाळेपासून व घरापासून खूप दूर आहे. तरीपण तिने अडचणीवर मात करत मळ्यापासून गावापर्यंत चालत येऊन एस.टी.ने प्रवास करून शाळा पूर्ण केली आहे. लहानपणापासूनच आकांशाला अभ्यासाची आवड होती तिने स्वतःच्या आत्मविश्वासावर व अभ्यासावर जोर देऊन हे यश संपन्न केले आहे. संजीवनी इंग्लिश मीडियम स्कूल तेरवाड मध्ये दहावीचे शिक्षण घेऊन तिने ९८.२०% इतके गुण मिळवून आपल्या आई-वडिलांचे नाव रोशन केले आहे. तिच्या यशाबद्दल सैनिक टाकळी मधून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. व तिच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.



# रोजगार हमी मंत्री संदिपान भुमरे यांनी घेतले श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन

पंढरपूर/प्रतिनिधीः राज्याचे रोजगार हमी व फलोत्पादन मंत्री संदिपान भुमरे यांनी आज श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले. यावेळी मंदीर समितीच्या वतीने तहसिलदार सुशिल बेल्हेकर यांच्या हस्ते शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देवून सत्कार करण्यात आला. यावेळी मंदीर समितीचे लेखा अधिकारी अनिल पाटील, महेश साठे यांच्यासह मान्यवर पदाधिकारी तसेच मंदीर समितीचे कर्मचारी उपस्थित होते.

# जगद्गुरू पांचाचार्य प्रशालेच्या दहावीचा निकाल ९७, ६०टक्के





अक्कलकोट/प्रतिनिधी : अक्कलकोट तालुक्यातील गौडगाव बु,!! येथील श्री गुरु सिद्धमल्लेश्वर कल्याण केंद्र संचलित श्री जगद्गुरू पंचाचार्य माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेच्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (१०वी) परीक्षेचा निकाल ९७.६०% लागला असून कुमारी - निर्मला लक्ष्मीपुत्र कुंभार ९२.००%गुण मिळवून प्रशालेत व करजगी केंद्रात प्रथम क्रमांक. कुमार .केतन रामेश्वर राठोड ८७.८०% गुण घेऊन प्रशालेत द्वितीय तर कुमारी .अंजली शिवानंद कुंभार ८४.८०% गुण मिळवून प्रशालेत.तृतीय क्रमांक. पटकावले आहे यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेचे विश्वस्त शिवाचार्य रत्न श्री ष.ब्र. डॉ. जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामीजी, संस्थेचे पदाधिकारी गटशिक्षणाधिकारी शेख, विस्तार अधिकारी भीमाशंकर वाले,केंद्रप्रमुख भीमाशंकर धडके, मुख्याध्यापक कल्याणी देशेट्टी,पर्यवेक्षक नारायण मोरे आदींनी अभिनंदन केले पुढील वाटचालीस शुभेच्छा दिले.

# पंढरपूर शहर आणि परिसरातील विविध ठिकाणची उपसचिवांनी केली पाहणी



पंढरपूर/प्रतिनिधी : आषाढी शुध्द एकादशी सोहळा २९ जून २०२३ रोजी असून, या सोहळ्यासाठी राज्यातील विविध जिल्ह्यातून तसेच परराज्यातून मोठ्या प्रमाणात भाविक पंढरपूर येत असतात. पंढरपूरात येणाऱ्या भाविकांना तसेच पालखीसोहळ्या सोबत येणाऱ्या वारकऱ्यांना अधिकच्या सोयी-सुविधा तसेच पंढरपूर शहर व परिसरातील रस्ते प्राधान्याने सुस्थितीत व दर्जेदार व्हावेत यासाठी नगरविकास विभागाचे उपसचिव अनिरुध्द जेवळीकर यांनी विविध ठिकाणची पाहणी केली. यावेळी त्यांच्यासमवेत प्रांताधिकारी तथा नगरपालिका प्रशासक गजानन गुरव, न.पा. जिल्हा प्रशासन अधिकारी आशिष लोकरे, नगर विकास विभागाचे कक्ष अधिकारी विलास धाईंजे, मुख्याधिकारी अरविंद माळी उपस्थित होते.

पंढरपूर आणि परिसरातील रस्ते वारीसाठी सुस्थितीत व्हावेत तसेच वारकरी व भाविकांना अधिकच्या सोयी-सुविधा उपलब्ध व्हाव्यात याकरीता शासनाचा निधी प्राप्त झाला आहे.

या निधीतून होणारी कामे वेळेत आणि दर्जेदार व्हावीत यासाठी मंत्रालयीन स्तरावरील नगर विकास विभागाच्या उपसचिवांनी प्रत्यक्ष पंढरपूर आणि क्षेत्रीयस्तरावर जावून देखरेख व संनियत्रण करण्याचे निर्देश मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिले आहेत. त्या अनुषंगाने नगर विकास विभागाचे उपसचिव अनिरुध्द जेवळीकर यांनी पंढरपूर येथील प्रदक्षिणा मार्ग, नदी पात्र, जलशुध्दीकरण केंद्र, मंदीर परिसर, ६५ एकर, वाखरी पालखी तळ, शहरातील अंतर्गत रस्ते आदी विविध ठिकाणची पाहणी केली. पंढरपूर शहर व परिसरातील अंतर्गत रस्ते वारकरी व भाविकांना वारीसाठी सुस्थित व्हावेत यासाठी रस्ता दुरुस्तीचे कामे दर्जेदार व कालर्यादेत करण्यासाठी आवश्यकती कार्यवाही तात्काळ करावी असे त्यांनी यावेळी सांगितले.


यावेळी शहरात येणारे रस्ते, शहरातील अंतर्गत रस्ते, मंदीर परिसरातील रस्ते, मठ, धर्मशाळा, भक्त निवास असणाऱ्या ठिकाणचे रस्ते, वारकरी व भाविकांची वर्दळ असणारे रस्ते, पाणी पुरवठा स्वच्छता, अग्नीशमन व्यवस्था, विद्युत व्यवस्था, औषध फवारणी आदी बाबतची माहिती घेतली.

यात्रा कालावधीत पंढरपूर नगरपालिका प्रशासनाकडून भाविकांसाठी देण्यात येणार आवश्यक सोयी-सुविधांची माहिती मुख्याधिकारी अरविंद माळी यांनी यावेळी दिली. यामध्ये मुबलक व स्वच्छ पाणी पुरवठा, स्वच्छता, औषध फवारणी, ६५ एकर, वाखरी पालखी तळ, नदीपात्र , पत्राशेड याठिकाणी देण्यात येणाऱ्या सुविधा तसेच तात्पुरते शौचालय व्यवस्था, नळ जोडणी, प्रकाश व्यवस्था आदीबाबची माहिती यावेळी त्यांनी दिली.

तत्पुर्वी

यांनीउपसचिव अनिरुध्द जेवळीकर यांनी नगरपालिकेच्यापाणी पुरवठा, स्वच्छता, बांधकाम, विद्युत आदी विभागाचा आढावा घेवून आवश्यक त्या सूचना दिल्या.

# शब्दकोडे क्र १७



आडवे शब्द १. चिंचा आल्यात पाडाला- या गीतातील पुढील ओळ ७. वैदूकडची औषधे १०. थेट, सरळ ११. हा खाताना घशात काटा अडकतो १२. मालाचा उठाव १४. मिळाला म्हणजे फायद्याचाच ठरला की! १५. जिजाबाईंचा पुत्र १७. जिरवण्याची ताकद २०. आवडता, प्रिय २१. नंतरचे नवराबायको २२. नमुनेदार २५. दक्षिणा वाटण्याची जागा २७. अति भयानक २९. रेशमाची गुंडाळी (अ.व.) ३०. 'कँटीन' असल्यावर हा कशाला? ३३. भलतेच विरुद्ध ३५. निर्बुद्ध, ढ ३६. दोनवेळा म्हटल्यास कटकट ३७. या काळातील घटना कुणाला कळल्यात! ३८. चकमक ४०. त्वरित, रातोरात ४१. रानरेडा ४२. नातवंडे म्हणजे दुधावरची --! ४३. दुलई ४४. उत्तराधिकारी ४७. फटाक्यात ठासून भरलेला मसाला ४८. काळ्या तोंडाचे माकड ५१. खोदकाम ५२. लिंबूपाणी ५४. न्याहरी-कधी उपासाची, कधी दिवाळीची! ५५. दुसऱ्यासाठी खिशाला चाट ५७. ओळख पटवणारे वैशिष्ट्य ५९. संपणे ६०. जन्मदाता, पिता ६१. माळी ६३. जगातील सगळ्यात घातक कीटक ६५. 'आ'काराची रेषा ६६. आमिषादाखल दाखवण्याचे कंदमूळ ६७. हे शहर काही आता पेन्शनरांचे राहिलेले नाही ६८. पंख ६९. किमान हालचाल ७१. वृद्ध ७२. '--सांगे ज्याला त्याला, वेड लागले राधेला' ७३. धमनी ७४. लोकरूढी, प्रथा ७७. बूड ७८. कोंब, अंकुर ७९. भिंतीवरून सरपटणारा प्राणी ८०. कबूतर ८१. दक्ष, दक्षतेचा इशारा

उभे शब्द १. जादूगाराचे कौशल्य-शर्विलकाच्याही हाती २. शेवट ३. हुबेहूब सोंग वठवणारा ४. घराची अब्रू घालवणारा ५. शंकराचे एक नाव ६. तिबेटी धर्मगुरु ७. पत्ता, शोध ८. तट्ट, फुगलेले ९. लक्ष पण अवधान नाही ११अ. गणेशमंदिरामुळे प्रसिद्ध असलेली पुण्यातील बाग १३. मजल, टप्पा १६. नियमित यात्रा करणारा १८. भरपूर कमाईचे 'जाडजूड; विशेषण १९. दरी २२. बांधकामासाठी कालवलेले मिश्रण २३. फुलांचे दागदागिने २४. टाळ्यांचा आवाज २६. सुकवलेली काळी द्राक्षे २८. रात्रभर ३१. लहान मूल ३२. आदित्यवार ३४. संत ज्ञानेश्वारांनी केलेली प्रार्थना ३५. बंदी, मज्जाव ३७. शिवशाहीचा ध्वज ३९. लिहिलेला लेख, संदेश इ. ४०. बांबूची मोठी टोपली, हारा ४५. एकरुप ४६. काम इ. लांबणे ४८. वारा, वायू, त्रास ४९. कच्चे लिखाण (इंग्रजी) ५०. वेदनेने ओरडणे, हळहळ व्यक्त करणे ५२. हुक्की, लहर ५३. अव्यवस्था, गोंधळ ५५. पाठशिवणीचा खेळ ५६. -- --- म्हणून लांडोरही नाचते (म्हण) ५७. हिंदीत रक्त ५८. चक्र ६०. पशू ६२. पुरुष ६४. राजाचा सैनिकी अधिकारी ६५. कान व डोळा यामधील भाग ६७. प्राचीन, जुने ७०. टक, दृष्टी ७५. कोरा ७६. त्याप्रमाणे

# पुणे पोलीस दलाच्या पायाभूत सुविधेसाठी १०० कोटी रुपयांचा निधी : ना.चंद्रकांतदादा पाटील

पुणे : पुणे व पिंपरी-चिंचवड शहर पोलीस आयुक्तालय आणि पुणे ग्रामीण पोलीस दलाच्या पायाभूत सुविधेकरीता जिल्हा नियोजन समितीमधून ५० कोटी आणि सामाजिक उत्तरदायित्व निधीमधून ५० कोटी असे एकूण १०० कोटी उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. त्यापैकी ४१ कोटी रुपये मंजूर करण्यात येत असून उर्वरित रक्कम लवकरच उपलब्ध करुन देण्यात येईल, असे प्रतिपादन पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी केले.

पुणे ग्रामीण पोलीसदलाअंतर्गत वेल्हे पोलीस ठाण्याच्या दुमजली नूतन इमारतीच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, जिल्हा पोलीस अधीक्षक अंकित गोयल, अतिरिक्त पोलीस अधीक्षक मितेश घट्टे, भोरचे उपविभागीय अधिकारी राजेंद्र कचरे, तहसीलदार दिनेश पारगे, गट विकास अधिकारी पंकज शेळके, उपविभागीय पोलीस अधिकारी भाऊसाहेब ढोले, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता बप्पा बहीर आदी उपस्थित होते.

पाटील म्हणाले, राज्याची कायदा व सुव्यवस्था सुस्थितीत ठेवण्यासाठी पोलीस दलाला सुसज्ज साधने, आणि पोलिसांच्या निवासस्थानासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. पुणे व पिंपरी-चिंचवड पोलीस शहर आयुक्तालय आणि पुणे ग्रामीण पोलीस दलाला वाहनासाठी जिल्हा नियोजन समितीमधून प्रत्येकी २ कोटी रुपये उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय व्यायामशाळेकरिता सुमारे २ लाख रुपयापेक्षा अधिकचा निधी देण्यात आला आहे.

वेल्हे येथील पोलीस ठाण्याचे बांधकाम अद्ययावत पद्धतीने करण्यात आले आहे. जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून या पोलीस स्थानकाच्या प्रशासकीय इमारतीचे बांधकाम आणि फर्निचर करण्यासाठी रुपये ३ कोटी ३४ लाख रुपये इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. यापुढेही आवश्यकता भासल्यास जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून पोलीस दलाला सुविधांसाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. कायदा व सुव्यवस्थेचे उत्कृष्ट कार्य या इमारतीतून व्हावे, अशी अपेक्षा पालकमंत्र्यांनी व्यक्त केली.पोलीस विभागाकडून गुन्ह्यांची उकल करण्यासाठी नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. त्यामुळे नागरिकांना आपल्या परिसरातील घटनेबाबत माहिती पोलिसांना दिली पाहिजे. पोलीस विभागाने निःपक्षपणे तपास करुन सर्व सामान्य नागरिकाला न्याय मिळवून दिला पाहिजे. महिला विषयक प्रकरणे, जातीय तंटे आदी प्रकरणे जलदगतीने तपास केला पाहिजे. गुन्हा घडूच नये यासाठी सदैव सावध असले पाहिजे.



वेल्हा तालुकाच्या विकासासाठी मागणीप्रमाणे पुरेसा निधी उपलब्ध करुन देण्यात येत असून यापुढेही विकासात्मक कामासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येईल, अशी ग्वाहीदेखील श्री. पाटील यांनी दिली.

विशेष पोलीस महानिरीक्षक श्री. फुलारी म्हणाले, वेल्हे पोलीस ठाण्याची इमारत ही पर्यावरणपूरक व निसर्गाला साजेशी आहे. सर्वसामान्य नागरिकाला न्याय देण्यासाठी पोलीस दल कार्यरत असून पोलीस अधिकारी व कर्मचारी पारदर्शकपणे काम करावे. आपल्या परिसरात अनुचित घटना घडल्यास नागरिकांनी पोलीस प्रशासनाशी संपर्क साधावा, असे आवाहन श्री. फुलारी यांनी केले. पोलीस अधीक्षक श्री. गोयल म्हणाले, जुने पोलीस ठाणे ब्रिटीशकालीन इमारतीत होते. सदर इमारत मोडकळीस आल्याने येथील कामकाज सन २०१६ पासून भाडेतत्वावर जागा घेऊन सुरु करण्यात आले होते. जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून पोलीस स्थानकाच्या नवीन इमारत बांधकाम आणि फर्निचरसाठी निधी उपलब्ध करुन देण्यात आला असल्याची माहिती श्री. गोयल यांनी दिली.यावेळी वेल्हे पोलीस स्थानकचे सहायक पोलीस निरीक्षक श्री. पवार यांचा सत्कार करण्यात आला. श्री. पवार यांनी पानशेत हद्दीत तीन वर्षीय मुलीवर झालेल्या बलात्कार प्रकरणी आरोपीचा ४८ तासात शोध घेतला. हा खटला 'फास्ट ट्रक कोर्टामध्ये चालविण्यात आला. उत्कृष्ट पद्धतीने तपास करुन पुरावे सादर केल्यामुळे आरोपीला फाशीची शिक्षा देण्यात आली. याबद्दल भारत सरकारच्या केंद्रीय गृहमंत्रालयामार्फत उत्कृष्ट तपासी अधिकारी म्हणून गौरव तसेच गृहमंत्री व पोलीस महासंचालक पदक प्राप्त झालेले आहे. यावेळी परिसरातील आजी माजी जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायतीचे सरपंच, सदस्य तसेच नागरिक उपस्थित होते.

वेल्हे पोलीस स्थानकाचे एकूण चटई क्षेत्रफळ ७८३.३० चौ. मी. आहे. तळमजला मजल्यावर एकूण १२ कक्ष असून पहिल्या मजल्यावर एकूण ६ कक्ष आहेत. या पोलीस स्थानक हद्दीत एकूण १२९ गावे असून क्षेत्रफळाने मोठी हद्द आहे. यामध्ये डोंगर दरे, दोन किल्ले, ३ धरणे व पर्यटन स्थळे, शिवकालीन मेंगाई माता देवीचे मंदीर, महाराणी राजमाता सईबाई समाधीस्थळ, पाल यांचा समावेश आहे. कर्मचाऱ्यांनी परिसरात वृक्षारोपणदेखील केले आहे.

## मानवाधिकार न्याय सुरक्षा संघटन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर रत्न पुरस्कार वितरण

### बार्टी प्रकल्प अधिकारी प्रणिता कांबळे यांना अहिल्या रत्न पुरस्काराने सन्मानित

सोलापूर/प्रतिनिधी : मानवाधिकार न्याय सुरक्षा संघटन भारत या आंतरराष्ट्रीय संघटनेमार्फत २०२३ सोहळा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर रत्न पुरस्कार वितरण करण्यात आला. कला, क्रीडा, साहित्य, राजकारण ,समाजकारण, शैक्षणिक अशा विविध क्षेत्रातील काम केलेल्या महिलांचा सन्मान या कार्यक्रमात करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात गणेश वंदनेने झाली,गणेश वंदना सन्माननीय लता कुंभार मॅडम यांनी सादर केले.यानंतर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून दीप प्रज्वलन करण्यात आले. माननीय श्री महम्मद यासिन् शेख,यांनी कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान स्वीकारून मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अनिल धायगुडे सर यांनी केली आहे त्यांनी



पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या संपूर्ण ऐतिहासिक कारकिर्दी विषयी माहिती दिली. अशा विविध क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यावेळेस कार्यक्रमात मानवाधिकार न्याय सुरक्षा संघटन भारतचे सदस्य महिला अध्यक्ष मालनबी शेख,कालिदास थोरवे, तानाजी माने, गोविंद वलेकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सत्कार मूर्तीमध्ये प्रकल्पाधिकारी प्रणिता कांबळे,कायदेशीर सल्लागार मर्जीना जमादार,प्रसिद्ध योगा सल्लागार लता कुंभार,समाज सेविका - भाग्यश्री वंजारे यांनी आपले मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भाग्यश्री वंजारे यांनी केले. प्रणिता कांबळे बार्टी प्रकल्प अधिकारी,लता कुंभार,शुभांगी लचके, भाग्यश्री वंजारे, राजश्री माने, सरस्वती कोले,अनुराधा खारे, मर्जीना जमादार, अनुराधा थोरात,तृप्ती पुजारी- चराटे, या विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान महिलांचा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले.

## शासनाचे काम छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांवर चालणारे : पालकमंत्री शंभूराज देसाई

सातारा : छत्रपती शिवाजी महाराजांना अपेक्षित असलेल्या संकल्पनांवर सध्या शासन काम करत असल्याचे प्रतिपादन उत्पादन शुल्क तथा पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी केले.मल्हारपेठ, ता. पाटण येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५० व्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमावेळी ते बोलत होते. यावेळी लोकनेते बाळासाहेब देसाई सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष यशराज देसाई, शिवदौलत बँकेचे अध्यक्ष मिलींद पाटील, कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती विजय पवार आदींसह नागरिक उपस्थित होते.छत्रपती शिवाजी महाराजांनी लोकांना आपले वाटावे असे स्वराज्य निर्माण केल्याचे सांगून पालकमंत्री श्री. देसाई म्हणाले, त्यासाठी आपल्या पूर्वजांनी बलिदान दिले आहे. रयतेचे राज्य निर्माण केले. सर्वांना प्रेरणा देणारे कार्य छत्रपती शिवाजी महाराजांनी केले. त्यांच्या विचारांची प्रेरणा घेऊन आम्ही सध्या काम करत आहोत. सर्वसामान्यांसाठी अनेक महत्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. त्यामध्ये नियमीत कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान देण्यात आले आहे. शासन आपल्या दारीच्या माध्यमातून आज मुख्यमंत्र्यांसह राज्यातील सर्व मंत्री जनतेपर्यंत पोहचत आहेत. त्यामुळे ग्रामपातळीवरील शासकीय कर्मचारीच नाही तर अनेक अधिकारीही शासकीय योजना जनतेपर्यंत पोहचवण्यासाठी गावांपर्यंत जात आहेत. एकाच दिवसात २७ हजार पेक्षा जास्त लाभार्थ्यांना लाभ देण्याचे कामही आपण केले आहे. त्यामध्ये अनेकांना कृषि अवजारे देण्यात आली. कामगारांना सुरक्षा किट



पुरविण्यात आले. अनेक प्रकारचे दाखले नागरिकांना देण्यात आले. राज्यात उद्योगक्षेत्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक आणण्यात आली आहे. दावोस येथे उद्योजकांचा चांगला प्रतिसाद लाभला आहे. याचे कारण सध्याच्या शासनावर उद्योजकांचा विश्वास असल्याचेही ते म्हणाले.

लोकनेते बाळासाहेब देसाई यांना छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल नितांत आदर असल्याचे सांगून पालकमंत्री श्री. देसाई पुढे म्हणाले की, लोकनेते श्री. देसाई यांनी महाराष्ट्रात समुद्र मार्गे येणाऱ्या प्रत्येकास प्रथम छत्रपती शिवाजी महाराजांचे दर्शन व्हावे या हेतूनेच गेट वे ऑफ इंडिया येथे त्यांचा पुतळा उभा केला. तसेच शिवाजी पार्क येथेही छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारला.

शिक्षणक्षेत्रात अमुलाग्र बदल करण्यासाठी कोल्हापूर येथे शिवाजी विद्यापीठाची स्थापना केल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी राष्ट्रपती पदक विजेते शाहीर बजरंग अंबी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावरील पोवाडा सादर केला.

## संविधान सोनकांबळे दहावी परीक्षेत उत्तीर्ण



अक्कलकोट/प्रतिनीधीः अक्कलकोट तालुक्यातील गोगांव येथील रहिवाशी सध्या कुरकुभ येथे नोकरीस असलेले शरणबसपा सोनकांबळे यांचे चिरंजीव संविधान सोनकांबळे यांनी ८०% गुण मिळवून दहावी परीक्षेत उत्तीर्ण झाले आहे श्री मंगेश मेमोरियल इंटरनॅशनल स्कूल दौंड या शाळेत शिकत असून मुख्याध्यापिका भोसले मॅडम, वर्गशिक्षका पल्लवी वाठरकर , सहशिक्षका भाग्यश्री डबडे, सहशिक्षक किशोर सालगुडे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. गोगांव येथे उपसरपंच कमलाकर सोनकांबळे यांनी पेढे वाटप करून आनंद उत्सव साजरा करण्यात आले

## श्री एस एस शेळके प्रशाला वागदरी एस.एस.सी.परीक्षेचा निकाल ९६.५५%



प्रथम क्रमांक बागवान ए.आय. 96.40%
द्वितीय क्रमांक ढवणे बी.एस. 94.80%
तृतीय क्रमांक भरमदे बी.सी. 92.40%

वागदरी/प्रतिनीधी : महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत वागदरी येथील श्री एस एस शेळके प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालययाचा निकाल ९६.५५% लागला आहे.प्रशालेतील गुणानुक्रमे पहिले तीन विद्यार्थी पुढील प्रमाणे प्रथम क्रमांक कुमार बागवान अहंमद इमाम कासीम ९६.४०%, द्वितीय क्रमांक कुमारी ढवणे भव्यश्री शिवलिंगप्पा ९४.८०% , तृतीय क्रमांक कुमारी भरमदे भाग्यश्री चंदप्पा ९२.४०% एकूण परिक्षार्थी-१४५, विशेष प्राविण्य - ५१, विद्यार्थी प्रथम श्रेणी ६३ विद्यार्थी द्वितीय श्रेणी -२४ विद्यार्थी पास श्रेणी- २ शाळेचा एकूण निकाल- ९६.५५% सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे, मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन संस्थेचे चेअरमन श्री बसवराज शेळके सावकार ,सर्व संचालक वृंद ,प्राचार्य श्री अनिल देशमुख, पर्यवेक्षिका सौ शैलशिल्पा जाधव यांनी केले

## राज्याच्या विकासात तेलंगणातील लोकांचे योगदान मोठे : राज्यपाल रमेश बैस

मुंबई : 'एक भारत श्रेष्ठ भारत' उपक्रमाचा भाग म्हणून यंदा प्रथमच महाराष्ट्र राजभवन येथे 'तेलंगणा राज्य स्थापना दिवस' साजरा करण्यात आला. राज्यपाल रमेश बैस यांच्या उपस्थितीत शुक्रवारी (दि. २ जून) झालेल्या या कार्यक्रमात तेलंगणाच्या संस्कृतीचे दर्शन घडवणारे कार्यक्रम सादर करण्यात आले.तेलंगणातील लोक अनेक दशकांपासून महाराष्ट्रात वास्तव्य करीत असून देशाच्या स्वातंत्र्य लढ्यामध्ये तसेच महाराष्ट्र राज्य निर्मिती आंदोलनामध्ये व त्यानंतर महाराष्ट्राच्या प्रगतीमध्ये तेलुगू समाजाचे योगदान मोठे आहे, असे गौरवोद्गार राज्यपालांनी यावेळी काढले. विविध राज्यांचे राज्य स्थापना दिवस साजरे करण्याच्या उपक्रमामुळे राष्ट्रीय एकात्मतेच्या कार्याला चालना मिळेल, असे राज्यपालांनी सांगितले.

भाषा, सण व सांस्कृतिक विविधतेने नटलेला भारत देश एका पुष्पगुच्छाप्रमाणे सुंदर असून देशाला आसेतु हिमाचल जोडण्यामध्ये आद्य शंकराचार्यांचे योगदान फार मोठे होते असे राज्यपालांनी सांगितले. यावेळी तेलंगणातून आलेल्या कलाकारांचे




कौतुक करताना, भाषा समजली नाही, तरी संगीत व नृत्यातून भाव समजतो व सांस्कृतिक आयोजनातून परस्पर प्रेम वाढते असे राज्यपालांनी सांगितले.यावेळी झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात 'जय जय हे तेलंगणा', 'बतकम्मा', 'बोनालू' व 'ओग्गु डोलू' नृत्याचे सादरीकरण करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन तेलंगणा शासनाच्या सहकार्याने करण्यात आले. कार्यक्रमाला तेलुगू अभिनेते हरीशकुमार यांसह तेलंगणा समाजातील श्रीनिवास सुलगे, अशोक कांटे, पोटटू राजाराम, जगन बाबू गंजी आदी उपस्थित होते.

## दहावीच्या परिक्षेत उत्तीर्ण झालेले विद्यार्थी



श्री. बसवेश्वर प्रशाला काजीकणबस ता.अक्कलकोट जि.सोलापूर दहावीच्या परीक्षेत शाळेमधून प्रथम क्रमांक कु.दिक्षा विनायक गायकवाड ९१.६०% टक्के वारी घेऊन प्रशाले मधून प्रथम क्रमांक आला आहे याबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे



गोगांव ता अक्कलकोट येथील रहिवाशी सध्या मुंबई येथे कामासाठी गेलेले बलभीम गोविंद कोंडे यांची मुलगी दहावी सेमी मध्ये ८१% मार्क घेवून अशोक नगर मनपा मराठी शाळेमध्ये एक नंबर आली आहे , परस्थिती हलाखीचे असताना देखील वडिलांनी मुलीला जिद्दीने शिकवत आहे यांची कौतुक गोगांव गावासह परिसरात होत आहे



## अंबिका जिरगे लाटी काटी आणि तलवार बाजी मध्ये प्रथम क्रमांक

पुणे/प्रतिनिधी : गोगांवची शिवकन्या अंबिका शरण जिरगे यांना लाटी काटी आणि तलवार बाजी मध्ये प्रथम क्रमांक मिळाला. श्री सद्गुरु कला क्रीडा बेस्ट प्लेयर विनर झाली आहे या स्पर्धेचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित बैलगाडा शर्यत या मराठी चित्रपटाच्या अभिनेत्री रुचिता जमादार यांच्या हस्ते गोगांव कन्या अंबिका शरण जिरगेला सायकल बक्षीस देऊन सन्मानार्थ सत्कार करण्यात आले, याप्रसंगी सद्गुरु कला क्रीडाचे प्रशिक्षक सहकारी उपस्थित, मूळचे गोगांव ता अक्कलकोट येथील रहिवाशी आल्याने गोगांव ग्रामस्थ व सरपंच सौ वनिता सुरवसे, उपसरपंच कमलाकर सोनकांबळे यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिले

## शिवसृष्टी प्रकल्पाला बंदरे व खनिकर्म मंत्री दादाजी भुसे यांची भेट

पुणे : बंदरे व खनिकर्म मंत्री दादाजी भुसे यांनी आज नऱ्हे, आंबेगाव येथे शिवसृष्टीला भेट देऊन पाहणी केली.महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठानचे विश्वस्त विनीत कुबेर, सुनील मुतालिक, शिवसृष्टी प्रकल्पाचे प्रशासकीय अधिकारी अनिल पवार, तहसीलदार किरण सुरवसे आदी यावेळी उपस्थित होते.



यावेळी मंत्री श्री. भुसे यांनी महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठानच्यावतीने उभारण्यात येत असलेल्या शिवसृष्टी प्रकल्पातील सुरू असलेल्या पहिला टप्प्यातील सरकार वाडा अंतर्गत महत्वाचे गडकिल्ल्यांची माहिती असलेले दुर्गवैभव, रणांगण : युद्धक्षेत्र, श्रीमंत योगी आज्ञापत्र, आग्र्याहून सुटका, शस्त्रांची गॅलरी, सिंहासनाधीश्वर, राज्याभिषेकाचे दालन येथे भेटी देऊन उत्सुकतेने माहिती घेतली. त्यांनी श्रीमंत योगी आणि आग्र्याहून सुटका या प्रसंगाचे दृकश्राव्य सादरीकरण प्रत्यक्ष पाहिले.३५० व्या शिवराज्याभिषेक वर्ष सोहळ्याला रायगड येथे उपस्थित राहिल्यानंतर लगेच येथे शिवसृष्टीला भेट देता आली याचा आनंद व्यक्त करून मंत्री श्री. भुसे म्हणाले, स्व. बाबासाहेब पुरंदरे यांनी आपले संपूर्ण जीवन छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनकार्याची आणि पराक्रमाची माहिती जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी व्यतीत केले. त्यांचा संकल्प शिवसृष्टीच्या कामाला गती देऊन महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठान पुढे नेत आहे. हा अवर्णनीय असा प्रकल्प आहे. राज्य शासनाकडून या प्रकल्पाला ५० कोटी रुपये देण्यात आले असून भविष्यातही सहकार्य केले जाईल. कंपन्यांचे सामाजिक उत्तरदायित्व निधीतून अधिकाधिक तरतूद उपलब्ध होण्यासाठी सहकार्य करण्यात येईल असेही ते म्हणाले.यावेळी विश्वस्त श्री. कुबेर यांनी प्रकल्पाविषयी माहिती दिली. हा एकूण ४३८ कोटी रुपये खर्चाचा एकूण ४ टप्प्याचा प्रकल्प असून ६० कोटी रुपये खर्चून पूर्ण झालेला पहिल्या टप्पा कार्यान्वित आहे. दुसऱ्या टप्प्याचे काम गतीने सुरू असून पुढील वर्षी शिवराज्याभिषेक दिनापूर्वी पूर्ण करण्याचे नियोजन आहे. २०२६ पर्यंत संपूर्ण प्रकल्प पूर्ण करण्याचे प्रयत्न आहेत, अशीही माहिती यावेळी देण्यात आली.